**नियमित दिवाणी दावा क्र.३७०/२०२५**

(सावित्राबाई जाधव वगैरे वि. सुमन जाधव व इतर)

**CNR No.MHSO07-000436-2025**

## निशाणी क्र.४२ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादी क्र.६ व १९ यांनी त्यांच्याविरुध्द पारित झालेला 'विना म्हणणे व कैफियत' चा आदेश रद्द होऊन म्हणणे व कैफियत दाखल करणेस झालेला विलंब माफ करुन अर्जासोबत दाखल केलेले म्हणणे व कैफियत स्वीकारणेकरिता दाखल केलेला आहे.

२. प्रतिवादींच्या कथनानुसार, प्रतिवादी क्र.६ हे अपंग आहेत व त्यांची पत्नी प्रतिवादी क्र.१९ हिला बी.पी. चा त्रास असून देखील तिला मजूरीने जावे लागते. त्यामुळे त्यांना याकामी महत्वाची कागदपत्रे मुदतीत मिळवून ती त्यांच्या वकिलांना देता आले नाही. त्यामुळे त्यांना मुदतीत म्हणणे व कैफियत दाखल करता आले नाही. सदर दावा हा स्थावर मिळकतीबाबत आहे. त्यांना मुदतीत म्हणणे व कैफियत दाखल करणेस विलंब झालेला आहे. त्यांनी जाणूनबुजून विलंब केलेला नाही. सबब, त्यांच्याविरुध्द पारित झालेला 'विना म्हणणे व कैफियत' चा आदेश रद्द होऊन त्यांना म्हणणे व कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येऊन त्यांनी अर्जासोबत दाखल केलेले म्हणणे व कैफियत स्वीकारण्यात यावे अशी त्यांनी विनंती केली आहे.

३. वादीने प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती केली आहे.

४. प्रकरणाचे अवलोकन केले असता हे स्पष्ट आहे की, प्रतिवादींचे देखील हक्क हितसंबंध दाव्यात गुंतलेले आहेत. त्यामुळे त्यांना त्यांच्या बचावाची संधी देखील मिळणे आवश्यक आहे. अशा परिस्थितीत प्रतिवादींच्या विनंतीनुसार त्यांच्याविरुध्द पारित झालेला 'विना म्हणणे व कैफियत' चा आदेश रद्द न केल्यास तसेच म्हणणे व

कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ न केल्यास आणि त्यांना त्यांचे म्हणणे व कैफियत दाखल करण्याची परवानगी न दिल्यास त्यांचे अपरिमित असे नुकसान होईल. परंतू तशाप्रकारे परवानगी दिली गेल्यास वादीवर कुठलाही अन्याय होत नाही. उलटपक्षी दावा गुणदोषावर निकाली करण्यास त्याची मदतच होते. त्यामुळे खालील आदेशाद्वारे प्रस्तुतचा अर्ज निकाली करण्यात येत आहे.

आदेश

| | |
|---|---|
| १. | अर्ज रक्कम रुपये २००/– खर्चासह मंजूर करण्यात येत आहे. |
| २. | प्रतिवादी क्र.६ व १९ यांनी खर्चाची रक्कम वादीस पुढील तारखेपर्यंत द्यावे. |
| ३. | प्रतिवादी क्र.६ व १९ यांनी वरीलप्रमाणे खर्चाची पूर्तता केल्यानंतर त्यांच्याविरुध्द पारित झालेला 'विना म्हणणे व कैफियत' चा आदेश रद्द करण्यात येत आहे. तसेच त्यांना म्हणणे व कैफियत दाखल करण्यास झालेला विलंब माफ करण्यात येत आहे आणि त्यांनी अर्जासोबत दाखल केलेले म्हणणे व कैफियत अभिलेखावर घेण्यात येत आहे. |

PRIYANKA RAMESH PATIL

Digitally signed by PRIYANKA RAMESH PATIL
Date: 2026.04.04 12:45:03 +0530

(पी. आर. पाटील)

दिनांकः– ०३.०४.२०२६ ५वे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, पंढरपूर

## <u>Certificate</u>

I affirm that the contents of this PDF file Judgment/Order are same word to word as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of the Stenographer | - | S. S. Tupdauru |
| Court | - | 5th Jt. C.J.J.D. & J.M.F.C., Pandharpur |
| Date of Judgment/Order | - | 03.04.2026 |
| Judgment/Order signed by the Presiding Officer on | - | 03.04.2026 |
| Judgment/Order uploaded on | - | 04.04.2026 |